Peer Reviewed

ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.7 • Issue 2 • 15 Dec. 2021 - 14 Mar.2022 • Rs.100/-

International
Interdisciplinary Multilingual Research Journal

Art's Commerce Science

Humanities & Social Science's

Language Literature & Cultural Studies

Journalism Law Lib. Science

Agriculture Medical

Physical Education Music

Management Engi & IT

All Subject

Editor
Dr.Kailas G.Kaninde

# INDEX


| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | Human Rights and Issue of Global Health | Dr. Kailas G. Kaninde | 01 |
| 02 | THE ROLE OF ICT IN HIGHER EDUCATION FOR THE 21ST CENTURY | Dr.Sidharth S.Jadhav | 06 |
| 03 | The Study of Sub-consciousness: the Women Victims in Nayantara Sahgal's Novels | Prin. Dr. Chandrakant Mandlik | 10 |
| 04 | प्रेमचंद के उपन्यास सिध्दांत | प्रा.कामोले एस.एम. | 14 |
| 05 | हिंदी साहित्य के क्षेत्र में कबीर युग-युग के गुरू | प्रा.योगिता भारतराव देशमुख | 17 |
| 06 | प्रगतिशील समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर | प्रा.कामोले एस.एम. | 19 |
| 07 | आंबेडकरवाद : सामाजिक, आर्थिक सर्वहारा वर्गाचे क्रांती विज्ञान | प्रा.डॉ. आदिनाथ इंगोले | 22 |
| 08 | भारतातील काळा पैसा : एक अभ्यास | डॉ.कैलास कानिंदे | 26 |
| 09 | राष्ट्रीय चळवळीतील पुढाऱ्यांची कामगिरी : सुरेंद्रनाथ बॅनर्जी | प्रा.राठोड व्ही.एस. | 29 |
| 10 | बोध्द स्त्री शिक्षण पध्दती आणि आधुनिक स्त्री शिक्षण पध्दती साम्य व भेद | छाया भिमराव उमरे | 33 |
| 11 | प्रथम स्त्री राज्यकर्ती : रजिया सुलतीना | प्रा.राठोड व्ही.एस. | 37 |
| 12 | भारतीय राज्यघटनेच्या प्रभावी अंमलबजावणीतच देशाचे हित | भैय्यासाहेब तुकाराम गोडबोले | 41 |
| 13 | शुर स्वातंत्र्य सेनानी हुतात्मा जयवंतराव पाटील यांचे हैद्राबाद स्वातंत्र्य लढयातील योगदान | प्रा.डॉ.वसंत कदम | 44 |
| 14 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार | प्रा.डॉ.अजय प्रभाकर कुटे | 48 |
| 15 | महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार एक अध्ययन | प्रा.डॉ.डी.के.कदम | 51 |

# महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार एक अध्ययन

**प्रा.डॉ.डी.के.कदम**
हु.जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड.

ज्या देशातील मानवी संपत्ती सुजाण, सुसंस्कृत, सौजन्यशील आणि सुदृढ असते तो देश श्रीमंत मानला जातो. शिक्षणानेच मानवाच्या अंगी हे गुण विकसीत होऊ शकतात. व्यक्तिगत जीवनात विद्या हेच माणसाचे भूषण आहे. मानवी जीवनाची मुहूर्तमेढ शिक्षणाने रोवली जाते. मानवी जीवनात शिक्षणाला अतिशय महत्त्वाचे स्थान असून, शिक्षणाशिवाय मानवाचा विकास होऊ शकत नाही. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

मानवी जीवनात शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व असून, जीवनाचचा अविभाज्य भाग असलेले शिक्षण हे शाळा, महाविद्यालया सारख्या औपचारिक शिक्षण संस्थाच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. मनुष्य  हा जन्मत: सुशिक्षित नसतो, परंतु प्रयत्नपूर्वक त्यांच्यावर शिक्षणाद्वसारे मूल्य संस्कार करुनच त्यांच्या व्यक्तिचा विकास साधता येतो. ज्ञानामुळे आत्मभान निर्माण करता येते. हे सर्व शिक्षणाशिवाय अशक्य आहे. शिक्षणामुळे प्रचंड ध्येयवाद, निर्भिडता, सुसंस्कृतपणा, कृतिप्रवणता स्वावलंबन आणि खऱ्या अर्थाने स्वहिताचा व राष्ट्रहिताचा साकल्याचे विचार करणारी व्यक्तीच तयार होते. खऱ्या अर्थाने सभ्य सुसंस्कृत मनुष्य घडवणे य सोबतच नैतिकतेची जोपासना कशी करावी. हे शिकवणे म्हणजे शिक्षण होय.

महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला महत्व दिले. शिक्षण ह्या संस्कृत शब्दाचा अर्थच मूळ उपदेशाने बदल करणे हा होय. स्थळ, काळ, पुरावे उपदेश सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्याचे कार्य शिक्षणाद्वारे होत असते. व्यक्तिमहत्त्वाचा दिलास होणे म्हणजेच पर्यायाने जबाबदार नागरिक निर्माण करणे, चांगली माणसे घडविणे व सामाजिक बांधिलकी पत्कारून समाजसेवा करणे महत्त्वाचे कार्य शिक्षणातून होत असते. भौतिक जीवन सुखी, समृद्ध व समाधानी होण्यासाठी, शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. महात्मा गांधींनी शिक्षणावर लढा केंद्रीत केले. त्यांच्या लक्षात आले ग्रामीण समाजाचा विकास करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

हे ओळखुन शिक्षणाला महत्त्व दिले. प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचारांचा आढावा घेतला आहे.

शैक्षणिक विचार मांडताना महत्मा गांधी म्हणतात शिक्षण म्हणजे मनुष्यात जे सर्वोत्कृष्ट आहेत ते बाहेर प्रगट होऊ देणे होय म्हणजेच त्यांचा मतानुसार प्रत्येक मानवात कोणते ना कोणते चांगले सर्वोत्कृष्ट गुण असतात. त्यांना बाहेर काढण्याची, प्रकट करण्याची संधी मिळावी. या विषयाचे त्यांचे शिक्षणाविषयाचे विचार होते. त्यांनी विद्यार्थ्यांतील सर्वोत्कृष्ट गुण बाहेर प्रगट करण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांची महत्त्वाची भुमिका आहे. हे स्पष्ट करतात.

महात्मा गांधी शिक्षणात शिक्षकांची भूमिका अतिशय महत्त्वाची का आहे. म्हणतात की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे शिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांत कोणते गुण आहेत त्या गुणांना विकसीत केले पाहिजे विद्यार्थ्यांना गुण व्यक्त करण्याची अनेक संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. परंतु आज समाजात विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव देण्याकडे दुर्लक्ष होतांना दिसून येते कारण पालक वर्ग आजच्या शिक्षणाच्या व्यवस्थेत फक्त व्यवसायीक दृष्टीकोन पाहून आपल्या पाल्यातील क्षमता, गुण न ओळखता त्यांच्या ओझ देण्याचे काम होतांना दिसून येते. म्हणून आज महात्मा गांधी यांच्या शिक्षण विषय विचार करण भारतीय समाजाला आहे.

आजच्या शिक्षण व्यवस्थेचे स्वरुप अतिशय विदारक बनले आहे. आज शिक्षण पद्धती व्यवसायाभिमुख शिक्षणाचा अभाव, सदोष परिक्षा पद्धती शिक्षण व्यवस्था राजकारणी, व्यवसायीकक यांच्य हाताची बाहूली बनली आहे. त्यामुळे आजचा विद्यार्थी फक्त जीवघेण्या स्पर्धेत फक्त तो ज्ञानार्थी, परिक्षार्थी बनला आहे. त्यांना प्रयोगशीलता वाव मिळत नाही. मिळला तरी फार काही त्यामुळे विद्यार्थ्यातील असलेल्या सुप्त गुणांना विकसीत करण्यासाठीची संधीच प्राप्त होत नाही. अनेक दडपणामुळे सुप्त गुणांचे दमन होते. परिणाम विद्यार्थ्यांत विकृत भावना निर्माण होतांना दिसून येतात.

आज महात्मा गांधीचे शिक्षणात मुलोदयोगी शिक्षणाला स्थान होते त्यांना वाटत होते की, शिक्षणात कोणता तरी उद्योग आपण मुलांना शिकवावा. या शिक्षणामुळे मुलांच्या मेंदू, शरीर व हृदय यांच्यत सुसंवाद निर्माण होईल. मानसिक विकास घडवून येईल शारिरीक व नैतिक शक्ती विकसीत होईल या शिक्षणात त्यांनी मुलभूत शिक्षण असे म्हटले होते. या

शिक्षणामुळे खेड्यांच्या नाश थांबेल आणि समाजातील श्रीमंती, गरीब ही विषमता नष्ट होईल. म्हणजेच त्यांच्या शिक्षणामुळे मुलांचा शारिरीक बौद्धीक व नैतिक विकास करणे हे शिक्षणाचे एकमेव उदिष्ट्ये होते.

आज शिक्षण पद्धतीतून हे घडतांना दिसत कारण वर्तमान शिक्षणात फक्त मेंदूच्या शिक्षणावर भर दिला जात आहे. मेंदूच्या शिक्षणामुळे मुलांचा बौद्धीक विकास होतो. हे नाकारुन चालत नाही. परंतु त्या ज्ञानाचा वापरच झाला नाही. तर त्या शिक्षणाचा काही उपयोग होत नाही. ते शिक्षण कुचकामी ठरते. महात्मा गांधीला अभिप्रेत असणारे शिक्षण हे ग्रामीण भागातील मुलामध्ये उद्योग क्षमता निर्माण करणारे असावे. आज शिक्षण पद्धती व्यवसाभिमुख म्हणजे उदयोगी शिक्षणाचा अभवा असल्यामुळे समाजात बेरोजगार तरुणांची फौज निर्माण झाली आहे. आज तरुणात शिक्षण घेऊन हाताला काम न मिळाल्यामुळे आजच्या तरुणात निराशेचे वातावरण निर्माण झाले. विधिग्रस्त तरुणांच्या हातून नको ते वर्तन होतांना दिसून येते कारण औरंगाबाद येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक राजन शिंदे यांची हत्या स्वत:च्या मुलाने केली हे वास्तव कारण आज मुलांना शिक्षणासाठी प्रत्येक आईवडिल जीवनाची पराकाष्टा करत आहेत. वाटेल ते करावे पण मुलांना शिक्षण द्यावे वाटेल ते म्हणजे आपण रोज मुजूरी, कोणते काम करावे, स्वत: उपाशी राहून मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे निरीक्षणाअंती वास्तव आहे. कारण रोजमजुरी करणारे आई-वडील आपल्या मुलांना शहरात शिक्षण देतांना दिसून येता हे वास्तव आहे. परंतू आई-वडिलांच्या मुलांसाठी शिक्षणावर पैसे करण्याची मर्यादा आहे. आज अनेक मुले एम.ए.,बी.एड् होऊन, सेट, नेट होऊन त्यांना काम नौकरी मिळत नाही. ते वयाच्या 30 वर्षापर्यंत आई-वडिलजांना पैसे मागतात तेंव्हा आई-वडिल अक्षरक्ष: हतबल झालेले असतात. मग आई-वडिलांकडून पैसे मिळत नाहीत. मुलांच्या आताला काम मीळत नाही. अशा परिस्थितीत मुले आत्महत्या करण्याच्या मानसिकतेतून जातांना दिसून येतांनत कारण M.P.S.C. परिक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलांना सेवेत समावून घेण्यासाठी उशिर झाल्यामुळे त्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्याकेली ही आवस्था आहे म्हणुन आज महात्मा गांधी यांच्या शिक्षण विषयक विचाराची नितांत गरज आहे. कारण समाजातील मुलांचे शिक्षण पुर्ण होताच त्यांना नौकरी नाही मिळाली तर ते कोणतातरी उद्योग व्यवसाय, टाकण्याची त्यांच्यात इच्छा निर्माण होईल म्हणुन आज महात्मा गांधी यांच्या शिक्षणात मुल उद्योगी शिक्षणाची गरज आहे. आज नांदेड शहरात स्पर्धापरीक्षेची

तयारी करून कोणतीतरी छोटी मोठी नौकरी मिळवावी या उद्देशाने मुले स्पर्धा परिक्षेचे कोचिंग क्लास करतात, तर काही मुलांना आता काहीतरी उद्योग केला पाहिजे हा दृष्टीकोन समोर ठेवुन उद्योगाकडे वळले आहेत. आज कांही विद्यार्थी M.A., B.Ed. Set, Net होऊन 'मेस' भोजनालय याचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने करतात. त्यांनी स्वत:च्या रोजगाराचा प्रश्न सोडविला पण आल्या कुटूंबाच्या रोजगाराचा प्रश्न सोडवला हे वास्तव आहे.

महात्मा गांधीजी यांनी स्पष्ट केले होते की, प्राथमिक शिक्षणात मुलांचे भविष्य आहे. त्यांना कोवळ मनावर चांगले संस्कार व्हावे, त्यांनी शिक्षणाची सुरूवात करतांना मुळ अक्षरांनी करु नये तर ते हस्त कौशल्याच्या शिक्षणांनी सुरूवात करावी. हस्तकौशल्य हा एक मानवाचा विशेष गुण आहे कारण तो मानवेत्तर प्राण्यात नाही. असे प्रसिद्ध अमेरिकन समाज शास्त्राज्ञ वेस्टर वार्ड यांनी स्पष्ट केले मानवाला भाषा आणि बुद्धी आहे तो आपल्या बुद्धीच्या जोरावर विकास झेप घेवु शकतो म्हणुन मुलाच्या शिक्षणाला हस्त उद्योगाची जोड असावी आज प्रत्यक्ष हस्तउद्योग गृहउद्योगांना मुलांच्या भेटी द्याव्यात प्रत्यक्ष हस्तउद्योग दाखवावे कारण त्यामुळे मुलांच्या मनात विचार करण्याची क्षमता निर्माण होईल, हाताने काम करण्याची इच्छा बाळगुन तो सराव करण्याचा प्रयत्न करेल. कारण प्रत्यक्ष डोळ्याने निरीक्षण केल्यानंतर निरीक्षणाची सवय लागेल म्हणुन महात्मा गांधीजी यांना वाटत होते की, हस्त उद्योगाचे व गृह उद्योगाचे शिक्षण मुलांना दिले तर मुले ज्या वस्तु बनवतील त्या वस्तुची विक्री केली जाईल. म्हणुन ज्या वस्तुचा मोबदला मिळेल, शिक्षण घेतांनाच तो कमवायला सुरूवात करेल, एक वेगळी श्रमप्रतिष्ठा मुलांमध्ये निर्माण होईल असा त्यांचा विश्वास होता महात्मा गांधी यांनी प्राथमिक शाळामध्ये उद्योगाची शिफारस करतांना म्हटले होते.

कपास, रेसीम और उनकी बिनाई से लेकर सफाई लढाई, पिंजाई, कटाई, रंगाई, मांड लगाना, दोस्ती करणा, डिझाईन बनाना तथा बुनाई आदी तमाम क्रिया मे और कसिदा काढना, सिलाई करणा, कागज बनवाना, कागज काटना, अलमारी फर्निचर तयार कराणा, खिलोने, बनवाना, और गुड बनाना, इत्यादी ऐसे निश्चित उद्योग है | जिसे आसानिसे सिखा जा सकता है | ते महात्मा गांधीचे विचार होते परंतु आज कुठेही प्राथमिक शिक्षणात महात्मा गांधी यांच्या विचारांना वाव नाही. फक्त मुलांना महात्मा गांधीजींच्या शिक्षण विषयक विचारांच्या विरोधी घेवुन जातांना दिसुन येते. कारण महात्मा गांधी यांनी अभ्यासक्रमात इंग्रजी शिक्षणाला थारा दिला नव्हाता कारण मॅट्रीक पर्यंतच्या अभ्यासक्रमात इंग्रजी विषय

राहणार असे स्पष्ट सांगुन त्यांनी इंग्रजी ऐवजी एक उद्योग शिक्षण दिले जाईल असे म्हटले होते. परंतु आज प्रत्येक आईवडीलांना आपल्या मुलाला इंग्रजी बोलता येणे एक मोठे पणाचे लक्षण बनले आहे. कारण इंग्रजी बोलणे म्हणजेच लहान बालक फार हुशार झाला अशी आजच्या पालकाची मानसिकता बनली आहे कारण तीन ते चार वर्षाच्य मुलाला A for Apple, B for Ball हे Z पर्यंत इंग्रजी शिक्षण देतांना दिसुन येते या इंग्रजी खाजगी शाळामुळे मुलांचे बालपण हरवत जात आहे. हे वास्तव नाकारता येत नाही.

आजही शिक्षण विषयक धोरणात महात्मा गांधीच्या विचारांना स्थान देवुन मुलउद्योगी शिक्षणावर भर दिला तर रोजगार निर्मिती करणाऱ्या प्राथमिक पद्धतीची अंमलबजावणी केली तर नक्कीच सुशिक्षीत बेरोजगारांची फौज कमी होईल विद्यार्थ्यामध्ये स्वावलंबन निर्माण होईल तो स्वत:च्या पायावर उभा राहून कांहीतरी करु शकतो. म्हणुन आज महात्म गांधीच्या शिक्षण विषयक विचारांची गरज आहे.

संदर्भ :-

1. बोरीकर दिनकर, माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत नारायणराव लोहारेकर प्रकाशक औरंगाबाद.
2. प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखत
3. गांधी महता ग्रामस्वराज्य नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
4. महाजन मुकूंद सुरेखा बेहेरे अर्थशास्त्र निराली पब्लिकेशन द्वि. औरंगाबाद.